सकाळ TODAY

पारंपरिक की वेस्टर्न?
पान - ७



अहिल्यानगर, गुरुवार, ९ जानेवारी २०२५

SakalNews SakalMediaNews esakal.com TOLL FREE: 9881 598 815

# कला, वाणिज्य महाविद्यालय 'नॅक'साठी सज्ज



**राहाता** : येथील शिर्डी साई रूरल इन्स्टिट्यूटच्या कला, वाणिज्य महाविद्यालयाची सुसज्ज इमारत.

**राहाता, ता.८** : येथील शिर्डी साई रूरल इन्स्टिट्यूटच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषद (नॅक) ची समिती येत्या २१ व २२ जानेवारी रोजी भेट देऊन पाहाणी करणार आहे. संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे महाविद्यालय नॅकला सामोरे जात आहे, अशी माहिती प्राचार्य सोमनाथ घोलप यांनी दिली.

महाविद्यालयात विविध समित्या स्थापन करून नॅकच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विविध विभागांची तयारी सुरू केली आहे. नॅक मूल्यांकनात शैक्षणिक व प्रशासकीय व्यवस्थेच्या गुणवत्ता, संशोधन, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि समाजसेवा यांचा समावेश आहे. महाविद्यालयाने या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पायाभूत सुविधा सुधारणे, डिजिटल लर्निंग साधनांचा उपयोग, संशोधन प्रकल्पांचा विकास, आणि शिक्षकांच्या क्षमतेच्या वाढीसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. ग्रंथालय, प्रयोगशाळा, तसेच क्रीडा आणि सांस्कृतिक विभागांची सुधारणा करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. तसेच महाविद्यालयात १.५ कोटी रुपये खर्च करून अत्याधुनिक सुविधांनी युक्त बंदिस्त प्रेक्षागृहची नवीन इमारत उभी राहात आहे, असे घोलप यांनी सांगितले.

> या महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नवी उंची गाठण्यासाठी सातत्याने मेहेनत घेतली आहे. सध्याची तयारी पाहाता, मागच्या मूल्यांकनापेक्षा अधिक सरस कामगिरी आम्ही करणार आहोत.
> **-डॉ.विक्रम भालेकर**, समन्वयक, गुणवत्ता व मूल्यमापन कक्ष.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
epaper.deshdoot.com
09 Jan 2025 - Page 08

# नॅक मूल्यांकनासाठी राहाता महाविद्यालयात तयारी सुरू



**राहाता (तालुका प्रतिनिधी)**– राहाता येथील शिर्डी साई रुरल इन्स्टिट्यूटच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषदेची समिती येत्या २१ वर २२ जानेवारी २०२५ रोजी भेट देत आहे. संस्थेचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी खा. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय नॅक मूल्यांकनाच्या तयारीसाठी उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

महाविद्यालयातील अभ्यासक्रम, अध्यापन, मूल्यांकन, संशोधन, विस्तार कार्य, मूलभूत सुविधा व विद्यार्थी साह्य व प्रगती, प्रशासकीय नेतृत्व व व्यवस्थापन, संस्थात्मक मूल्य व नावीन्यपूर्ण उपक्रम आदींची पाहणी करून नॅक समिती हा दर्जा बहाल करणार आहे. उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे प्रमाणीकरण करणाऱ्या या मूल्यांकनासाठी महाविद्यालय, प्रशासन, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी एकत्रितपणे प्रयत्नशील आहेत.

महाविद्यालयाने विविध समित्या स्थापन करून नॅकच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विविध विभागांची तयारी सुरू केली आहे. शिक्षण, क्रीडा, गुणवत्ता, संशोधन, पायाभूत सुविधा, विद्यार्थी कल्याण, आणि सामाजिक जबाबदारी या सर्व बाबींचा समावेश असलेला अहवाल तयार करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

याप्रसंगी डॉ.सुजय विखे पाटील म्हणाले, महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी आम्ही दीर्घकालीन योजना आखल्या आहेत. नॅक मूल्यांकन ही केवळ एक औपचारिकता नसून, आमच्या शैक्षणिक व प्रशासकीय व्यवस्थेचा गुणवत्ता, संशोधन, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि समाजसेवा यांचा समावेश आहे. महाविद्यालयाने या सर्व क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आता ती राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवण्यासाठी सज्ज आहे.

शालिनीताई विखे पाटील म्हणाल्या, नॅक मूल्यांकनाच्या श्रेणीवरून कोणत्याही उच्च शिक्षण संस्थेचा दर्जा ठरत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण मिळावे यासाठी महाविद्यालय, संस्था यांचे नॅक मूल्यांकन होणे अतिशय गरजेचे आहे. पण ही प्रक्रिया क्लिष्ट असते. त्यामुळे अनेक शिक्षण संस्था याकडे दुर्लक्ष करतात. चालू शैक्षणिक वर्षात आपल्या सर्वच शिक्षण संस्थांचे मूल्यांकन पूर्ण होईल, असे त्या म्हणाल्या.